# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

**दुरध्वनी क्र.** 0712-6465145/46 **फॅक्स क्र.** 0712-2561663

**E-mail : ronagpur.dte@gmail.com** **Website: rdtenagpur.org.in**


क्र.तशिस/विकाना/ईबीसी/2015/ 3686

दिनांक:- 7 DEC 2015

प्रति,

संचालक/प्राचार्य,
सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
पदवी /पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

विषय:- खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या 50 टक्के प्रतिपुर्तीबाबत. **शैक्षणिक वर्ष 2015-16 करीता ऑफ लाईन (Manual) अर्ज भरून पाठविण्याबाबत.**

संदर्भ:- 1. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.15/तंशिस/अर्थस/ईबीसी-ऑफलाईन-फार्म/2015/ 152, 01 ऑक्टोबर 2015
2. या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/प्राकाना/ईबीसी/2015/ 3090, दि 05/10/2015

या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये , सर्व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष 2015-16 मध्ये शासनाच्या केन्द्रीभुत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या 50 टक्के प्रतिपुर्तीबाबत आकडेवारीसाठी विद्यार्थ्यांचे **ईबीसी अर्ज ऑफ लाईन** (Manually) संस्थांनी विद्यार्थ्यांकडून **दि. 30 ऑक्टोबर** 2015 पर्यंत भरून सादर करण्यांबाबत कळविण्यांत आले होते , त्या अनुषंगाने काही संस्थेने अर्ज सादर केलेले आहेत . परंतू काही संस्थेचे अर्ज प्राप्त झालेले नाही अशा सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, त्यांच्या संस्थेतील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरून झाल्यानंतर **दि. 15 डिसेंबर** 2015 पर्यंत या कार्यालयास खालील मुद्रदयास अनुसरून सादर करावे. विहीत केलेल्या मुदतीनंतर येणाया अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही, त्यामुळे आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांनां शैक्षणिक शुल्काच्या 50 टक्के प्रतिपुर्तीचा लाभ मिळणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांनी राहील यांची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी .

1. सदर पत्रासोबत अर्जाचा नमुना (ऑफ लाईन अर्ज भरण्याकरीता) देण्यात येत आहे. सदर नमुन्यातच अर्ज सादर करावे. अर्ज दोन प्रतीत घ्यावे व एक प्रत संस्थेत ठेवावी.
2. अर्जसोबत सक्षम अधिका-यांनी दिलेला कुटुंब प्रमुखाचा मुळ उत्पनाचा दाखला रु. 100000/- किंवा त्यापेक्षा जास्त नसावा. वडील हयात नसल्यास मृत्यु प्रमाणपत्रासह आईचा उत्पनाचा दाखला सादर करावा.
3. Admision Conformation letter सोबत जोडावे.
4. Domicile/TC (with mention of place of brith)/birth certificate सोबत जोडणे आवश्यक आहे.
5. कुटुंब मर्यादित असल्याबाबतचे प्रमाणपत्र (राशन कार्ड) सोबत जोडावे.
6. मागील वर्षाची मार्कशिट (फक्त पास किंवा एटीकेटी **कॅरीऑन विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागु नाही.**)
7. आधार कार्ड (आधार कार्ड कोअर बँकींग सुविधा असलेल्या बँकेशी सलग्न असणे आवश्यक)

8. सर्व कागदपत्रे साक्षांकित असणे आवश्यक आहे.

9. अर्ज छाननी करण्याकरीता आपल्या संस्थेतील 03 शिक्षकीय पदावर कार्यरत असलेला अधिव्याख्यात्यांची समिती तयार करून त्यांचेकडून अर्जाची छाननी करण्यात यावी व फक्त वरीलप्रमाणे दस्ताऐवज जोडलेले पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज या कार्यालयास सादर करावे.

10. सर्व पात्र विद्यार्थ्यांकडून दि. 30/10/2015 अर्ज मागविण्यात यावे. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याबाबत नोंद घ्यावी. त्याकरीता आपल्या संस्थेतील प्रत्येक वर्गात परीपत्रक फिरवून याबाबत सर्व विद्यार्थ्यांना माहिती देण्यात यावी व विहीत मुदतीत अर्ज मागवून घ्यावे.

11. अर्ज तपासून झाल्यानंतर एकत्रित अर्ज, पात्र विद्यार्थ्यांची यादी व सोबत जोडलेल्या प्रपत्रात विद्यार्थ्यांची प्रवेश वर्ष निहाय माहिती या कार्यालयास सादर करावी. यादीमधील अर्ज क्रमांक प्रत्येक अर्जावर नमुद करावा.

वरील बाबींची पुर्तता झाल्यानंतर सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज, अर्जांची यादी व प्रपत्रात माहिती या कार्यालयास **दि. 15 डिसेंबर 2015** पर्यंत जमा करण्यात यावी. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याबाबत नोंद घ्यावी.

**ऑफ लाईन अर्ज सादर केल्यानंतर काही कालावधीनंतर ऑनलाईन लिंक देण्यात येईल. त्यामध्ये फक्त ज्या विद्यार्थ्यांनी ऑफ लाईन अर्ज सादर केलेले आहेत अश्याच विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा देण्यात येईल व तेच विद्यार्थी या योजनेकरीता पात्र ठरतील याबाबत सर्व संस्थांनी नोंद घ्यावी.**

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (कार्यासन क्र . 15)